# संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषी)
# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

ई–मेल: dean_agri@pdkv.ac.in

जा. क्र.: अधि.कृषि./तां.अ./नोडल अधिकारी/६५ /२०२६ दिनांक: ०६/०५/२०२६

## कार्यालयीन आदेश

**विषय** : अनुदानित आणि विनाअनुदानित महाविद्यालयांकडून आकारलेल्या अतिरिक्त शुल्क तक्रारींचे निवारण करण्यासाठी विद्यापीठ स्तरावर नोडल अधिकारी (तक्रार निवारण अधिकारी) म्हणुन नियुक्ती करण्याबाबत.

**संदर्भ** : १. उच्च व व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण–२०२५/प्र.क्र.६०९/तांशि–४ए, दि. ११/०८/२०२५
२. कृषि परिषद, पुणे यांचे पत्र क्र. मकृप/शिक्षण–१/२२२५/४१५/२४७०,दि.२९/०८/२०२५.

वरील संदर्भांकीत पत्रान्वये व विषयाच्या अनुषंगाने, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण–२०२५/प्र.क्र. ६०९/तांशि–४ए, दि. ११/०८/२०२५ अन्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत असलेल्या विविध अनुदानित आणि विना अनुदानित संस्था/महाविद्यालयातील व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश, तंत्र शिक्षण संचालनालय व राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष यांच्याकडून केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेव्दारे निश्चित केले जातात. सदर प्रवेश घेत असतांना संस्था/महाविद्यालय, शुल्क नियामक प्राधिकरण /शुल्क निश्चिती समितीकडून निर्धारीत केलेल्या शुल्कापेक्षा जास्त शुल्काची मागणी विद्यार्थ्यांकडून करीत असल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त होतात.

या अनुषंगाने विद्यापीठ अंतर्गत सर्व अनुदानित व विनाअनुदानित खाजगी कृषी व तत्सम महाविद्यालयातील अभ्यासक्रमांसाठी निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा जास्त शुल्क आकारले जात असल्याच्या प्राप्त तक्रारींचा विहित वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने निपटारा करण्याकरीता **डॉ. एन. व्ही. शेंडे, सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण) डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला (भ्रमणध्वनी क्र.: ९८२३२७४५७४, ई–मेल: adiakola@pdkv.ac.in)** यांची विद्यापीठ स्तरावर **नोडल अधिकारी (तक्रार निवारण अधिकारी)** म्हणुन नियुक्ती करण्यात येत आहे.

संचालक शिक्षण तथा
अधिष्ठाता (कृषि)
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

प्रतिलीपी:

१. डॉ. एन. व्ही. शेंडे, सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहिती व पुढील कार्यवाहीकरीता अग्रेषित.
२. कुलसचिव, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहितीकरीता अग्रेषित.
३. उपकुलसचिव (विद्या), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहिती व पुढील कार्यवाहीकरीता अग्रेषित.
४. प्रभारी अधिकरी, कृषी संशोधन माहिती यंत्रणा कक्ष, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहिती व विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता अग्रेषित.
५. प्राचार्य (सर्व), अनुदानित व विनाअनुदानित खाजगी कृषी व तत्सम महाविद्यालये यांना माहितीकरीता अग्रेषित.
६. कुलगुरू यांचे तांत्रिक सचिव यांना मा. कुलगुरू, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे माहितीस्तव.